पोलीस उप अधीक्षक कार्यालय ★ अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

दिनांक १२/०८/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक उदय सुधाकर कुलकर्णी, तलाठी, सज्जा मिटमिटा, ता. जि. औरंगाबाद यांनी ५०००/- रु लाच स्विकारल्याने ते औरंगाबाद लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | **उदय सुधाकर कुलकर्णी, तलाठी,सज्जा मिटमिटा, ता. जि. औरंगाबाद.** |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. |
| ठिकाण | :- | तलाठी कार्यालय,सज्जा मिटमिटा,तोरणागड हाऊसिंग सोसायटीच्या बाजुला औरंगाबाद |
| लाच स्विकारली रक्कम | :- | ५,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे पत्नीचे नावे खरेदी केलेल्या प्लॉटची सातबारावर नोंद होणे करीता |
| तपासी अधिकारी | | श्री. उन्मेष थिटे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांनी पडेगांव साई नगर येथे पत्नीचे नावे प्लॉट खरेदी केलेला आहे. सदरचे प्लॉटची नोंदणी सातबारा वर करण्याकरीता तलाठी उदय कुलकर्णी, सज्जा मिटमिटा, औरंगाबाद यांनी ५,०००/- रु लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद कडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, तलाठी उदय कुलकर्णी, यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक १२/०८/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे उदय सुधाकर कुलकर्णी, तलाठी, सज्जा मिटमिटा, ता.,जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ५०००/- रुपये लाचेची रक्कम तलाठी कार्यालयात स्विकारल्याने त्यांना रंगेहात ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.श्री.अरविंद चावरिया, अपर पोलीस अधीक्षक मा.डॉ.अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री उन्मेष थिटे यांनी केली आहे. त्यांना पोना/राठोड, देशमुख, पोशि/ जोशी, चापोशि चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

12/08/2020

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**